दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१६ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 16 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 58 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### फेक नरेटीव्ह करण्याचा प्रयत्न

**मुंबई**–सीएम फडणवीस म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे काहीच चोकलिंगम यांच्याकडे नाही. यासाठी वेगळा कायदा आहे. त्याचे संपूर्ण काम दिनेश वाघमारे यांच्या नेतृत्वात आहे. त्यावर संपूर्ण कंट्रोल हा वाघमारेंकडे देण्यात आला आहे. काल हे सर्व महाभाग चोकलिंगम यांना भेटले. मग त्यांना कळाले की आपण वाघमारेंना भेटायला हवे होते. मग काही तरी थातूर मातूर सांगितले. हे वाघमारेंना बोलवणार आहेत त्यांना वाघमारेंना बोलावण्याचा अधिकार नाही. वाघमारेंना भेटून काय मागणी करावी हे त्यांना समजले नाही. राज्य निवडणूक आयोग हे राज्यातील सर्व निवडणूक घेत असते. वोटर लिस्टच्या संदर्भात ते आक्षेप घेण्यासाठी वेळ देत असतात. पण कायदा समजून घ्यायचा नाही आणि फेक नरेटीव्ह करण्याचा प्रयत्न करत आहे.

# मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात यलो अलर्ट जारी

## राज्यभरात पुन्हा हवामान विभागाचा मुसळधार पावसाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रातून परतीच्या पावसाला सुरुवात झाली असून, राज्यभरात पुन्हा एकदा हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. भारतीय हवामान खात्याने पुढील दोन दिवस मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, १७ ऑक्टोबरपर्यंत काही भागांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाचा जोर कायम राहणार असून, त्यानंतर पावसाची तीव्रता हळूहळू कमी होईल.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, देशभरातून नैऋत्य मोसमी पाऊस माघारी फिरण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. येत्या दोन दिवसांत संपूर्ण देशातून नैऋत्य मोसमी पाऊस परतणार आहे, असा अंदाज खचऊने वर्तवला आहे. सध्या परतीच्या मान्सूनची सीमा कारवार, कलबुर्गी, निझामाबाद, कांकर, केओंझघर, सागर आयलंड, गुवाहाटी या मार्गावरून जात आहे. देशाच्या एकूण परतीच्या क्षेत्रापैकी सुमारे ८५ टक्के भागातून मान्सून माघारी फिरला आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात आता परतीचा पाऊस सक्रिय झाला आहे.



**पावसाचा फायदा कोणाला**

हा परतीचा पाऊस शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकतो. कापूस, सोयाबीन, ज्वारी आणि हरभरा या पिकांना ओलावा मिळणार असल्याने मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल.तथापि, काही ठिकाणी आधीच पिके काढणीला लागल्याने मुसळधार पावसाने नुकसान होऊ शकते, अशी शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

### पुढील काही दिवसांचे हवामान चित्र

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या माहितीनुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील चार ते पाच दिवस कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही. त्यानंतर किमान तापमान दोन ते तीन अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. म्हणजेच, पावसाची तीव्रता ओसरल्यानंतर हवामान पुन्हा कोरडे होण्याची शक्यता आहे.

### कुठे आहे यलो अलर्ट

राज्यात बहुतांश भागात पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. तळकोकणात, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर रायगड, ठाणे, मुंबई, पालघर परिसरात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, नगर, संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर विदर्भातील अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ संस्थेला जाहीर झाला.या पुरस्काराचे वितरण १३ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले आहे.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी श्री. अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती, नाविन्यपूर्ण सेवा व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट




केले आहे. सभासदांच्या विश्वासाला मुकुट तुळजाभवानी अर्बनला दिपस्तंभ पुरस्कार संस्थेच्या या यशाबद्दल अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब, सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब, तसेच संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केला.

हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे, असे अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब यांनी सांगितले.यशामुळे संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये उत्साह नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रवादीचे निष्ठावान अशोक वीर यांच्या पत्नी छाया अशोक वीर बीड न.प.नगराध्यक्षपदासाठी सक्षम पर्याय

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड न.प. आगामी नगराध्यक्षपदाची निवडणूक अनुसूचित जाती (डउ) प्रवर्गासाठी राखीव आहे, आणि अशा पार्श्वभूमीवर छाया अशोक वीर यांचे नाव जनतेतून जोरदारपणे पुढे येत आहे. अशोक वीर यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर,माजी नगराध्यक्ष भारतभुषन क्षीरसागर,डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासोबत काम करत ३५ वर्षांच्या कारकिर्दीत सामाजिक आणि स्थानिक राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. अशोक वीर यांची कार्यक्षमता विकासकामे बहिरवाडी सर्कलचे माजी सरपंच असताना, त्यांनी नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सरकारी विहीर मंजूर करून, त्यानंतर आणलेल्या दोन मोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे त्या भागातील पाण्याची



समस्या दूर झाली आहे.

सामाजिक न्याय गायरान जमिनीवरील रहिवाशांना मालकी हक्क मिळवून देणे आणि अनुसूचित जातींसोबत इतर घटकांना घरकुल योजनेचा लाभ देणे यांसारख्या उपक्रमांनी त्यांनी सामाजिक न्यायाची योग्य दिशा दाखवली आहे.संघर्ष आणि प्रयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनासाठी जागेच्या समस्येवर त्यांनी केलेला लढा नागरिकांच्या मनात स्मरणात ठसा ठेवतो.

जनतेचा विश्वास SC समाजातील खऱ्या विकास पुरुष म्हणून अशोक वीर यांची ओळख आहे. नागरिकांतून छाया अशोक वीर ह्याच भावी नगराध्यक्ष असावे, अशी मागणी जोर धरत आहे. त्यांच्या नेतृत्वात बीड शहराचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास कार्यकर्ते आणि नागरिक व्यक्त करत आहेत.छाया अशोक वीर यांचे नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी देणे हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासाठी एक सक्षम निर्णय ठरु शकतो, आणि या माध्यमातून पक्षाला चळवळीतील एक प्रभावशाली चेहरा मिळेल.

### दैनिक वादळ वार्ताच्या बातमीचा इम्पॅक्ट !

## वैजाली-नांदर्डे पुलाच्या बांधकामाचा तिढा अखेर सुटला

### १७.९९ कोटींच्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता प्रक्रियेला वेग

### रस्ता रोको आंदोलन मागे घेण्याची विभागाची केली विनंती

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा तालुक्यातील वैजाली ते नांदर्डे या गावांना जोडणाऱ्या वाकी नदीवरील रखडलेल्या पुलाच्या बांधकामाचा तिढा अखेर सुटला आहे. 'दैनिक वादळ वार्ता' मध्ये दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रकाशित झालेल्या वृत्तामुळे प्रशासनाने तत्काळ हालचाल सुरू केली असून, आता या पुलासाठी वाढीव खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.



सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलाच्या सुधारित आराखड्यासह एकूण १७९९.६२ लक्ष (जवळपास १८ कोटी रुपये) इतका वाढीव खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. या सुधारित अंदाजपत्रकास आदिवासी विकास विभागाकडे प्रशासकीय मान्यता मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

विभागाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामस्थ, शेतकरी व शालेय विद्यार्थ्यांना पत्राद्वारे माहिती देत सांगितले की, मुख्य अभियंता (संकल्पचित्र विभाग - पूल), कोकण भवन, नवी मुंबई यांच्या सूचनेनुसार सुधारित सर्वेक्षण व तांत्रिक तपासणीनंतर नवीन 'जनरल अरेंजमेंट ड्रॉईंग' मंजूर करण्यात आली आहे.

प्रशासकीय मान्यता मिळताच हे काम के. के. पटेल, शहादा यांच्यामार्फत पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, पुलाच्या बांधकामादरम्यान नागरिकांच्या सोयीसाठी तात्पुरता वळण रस्ता ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

ग्रामस्थांनी पुलाच्या कामातील विलंबाविरोधात १६ ऑक्टोबर रोजी रस्ता रोको आंदोलनाची घोषणा केली होती. मात्र, आता विभागाकडून तातडीने कार्यवाही सुरू झाल्याने आणि वाढीव खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे गेल्यामुळे विभागाने नागरिकांना आंदोलन मागे घेण्याची नम्र विनंती केली आहे.

या घडामोडींमुळे वैजाली, नांदर्डे व परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांमध्ये दिलासा आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'दैनिक वादळ वार्ता'च्या प्रभावी वृत्तामुळे शासन यंत्रणा हलली आणि रखडलेले पुलाचे काम मार्गी लागण्याच्या दिशेने पहिले ठोस पाऊल पडले आहे.

## दिव्यांगांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण द्यावे-मुन्ना फिरोजअली सिद्दीकी




दैनिक वादळ वार्ता
**औसा । खालेद काझी**

औसा येथील सामाजिक कार्यकर्ते मुन्ना फिरोजअली सिद्दीकी यांनी दिव्यांग (अपंग) व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षण मिळावे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याची मागणी केली आहे.या संदर्भात त्यांनी औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यु पवार साहेब यांना निवेदनाद्वारे मागणी सादर केली.

सिद्दीकी यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्तींना समाजात आपले प्रतिनिधित्व मिळावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची तरतूद होणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने इतर समाजघटकांप्रमाणे दिव्यांग बांधवांसाठीही आरक्षण लागू केल्यास त्यांना आपल्या समस्या थेट मांडण्याची आणि समाजघटकांच्या विकासासाठी काम करण्याची संधी मिळेल.

या निवेदनावर आमदार अभिमन्यु पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हा मुद्दा शासनाकडे मांडण्याचे आश्वासन दिले आहे.

## संपादकीय

# अफगाणी मैत्री

एखाद्या देशाचा परराष्ट्रमंत्री भारत भेटीवर येतो, त्याप्रित्यर्थ भारताच्यावतीने त्याच्या देशाला आरोग्यविषयक सुविधांची मदत जाहीर केली जाते : वीस रुग्णवाहिका, पाच प्रसुतीगृह, एकतीस खाटांचं रुग्णालय, एक ट्रॉमा केअर सेंटर आणि कर्करोग निदान व उपचार केंद्र! सुविधांचं स्वरूप आणि संख्या, या दोन्ही गोष्टींवरून संबंधित देशाची आर्थिक स्थिती आणि आकार या दोन्ही बाबी स्पष्ट होतात. तरीही या गरीब, मागास, छोट्याशा देशाच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या भारत दौऱ्याने भारतीय माध्यमांतून बरीच जागा व्यापली. या दौऱ्यानिमित्त बरीच उलटसुलट चर्चा झाली. कारण हा देश आशिया खंडाच्या हृदयस्थानी आहे. आशियात शांतता आणि स्थिरता हवी असेल, तर या देशाला सांभाळावं लागेल. बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणात तर हा देश भारताच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.म्हणूनच त्या देशाची सध्याची राजवट, तिथे झालेलं सत्तांतर, राज्यकर्त्यांची मागास विचारपद्धती या कशाचाही विचार न करता भारताने अफगाणिस्तानचे तालिबानी परराष्ट्रमंत्री अमिरखान मुत्तकी यांचं अगत्याने स्वागत केलं; भारत-अफगाणिस्तान मैत्रीच्या आणाभाकाही घेतल्या. भारत आणि अफगाणिस्तान हे खरे तर जुने मित्र. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यावेळीही अफगाणिस्तानने भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनुकूल भूमिका घेतली होती. पण, विमान अपहरणाचं प्रकरण झालं, २०२१ मध्ये तालिबान्यांनी अफगाणिस्तानचा ताबा घेतला आणि भारताने या देशापासून चार हात लांब राहण्याचं धोरण घेतलं. पण, असं फार काळ करता येत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात परिस्थितीनुसार भूमिका घ्याव्या लागतात; आपल्या मूळ भूमिकेत सुधारणा कराव्याच लागतात. पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या आणि तालिबानी राजवटीनंतरही पाकिस्तानशी हाडवैर असलेल्या अफगाणिस्तानला जोडून घेणं भारताच्या भूराजकीय रणनीतीच्या दृष्टीने आवश्यक होतं. तिथल्या तालिबानी सरकारची विचारसरणी, मूळ प्रवृत्तीकडे त्यासाठी काही काळ दुर्लक्ष करावं लागलं, तरी ते भारताच्या सुरक्षा आणि अन्य हितसंबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचं होतं. भारत सरकारने नेमकं तेच केलं.भारताची स्वतःची राजनैतिक भूमिका आहे. लोकशाही, प्रजासत्ताक, विकेंद्रित राजकीय व्यवस्थेला भारत नेहमीच पाठिंबा देत आला आहे. साम्राज्यवादी किंवा मूलतत्त्ववादी विचारांना, हिंसक-कालबाह्य दुराग्रहांना, स्त्रियांविषयी समानतेचा दृष्टिकोन न बाळगणाऱ्यांना भारत राष्ट्र म्हणून मित्र मानू शकत नाही; अशा सत्ताधाऱ्यांना मान्यताही देऊ शकत नाही. पण, मैत्रीच्या आपल्या निकषांवर, आपल्या मूल्यांवर श्रद्धा असलेले, समविचारी सत्ताधारी विविध देशांत येतीलच असं नाही. केवळ तेवढ्या मुद्द्यावर अडून आपण मैत्री गमावता गेलो, तर त्यातून आपल्या शत्रूंचंच फावेल. आपणच आपल्याला असं पेचात पकडून कसं चालेल? नेमका हाच विचार करून भारताने मुत्तकी यांचं अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री म्हणून आगतस्वागत केलं. त्यांच्याशी बोलणी केली. पण, तालिबानी राजवटीला अधिकृत मान्यता काही दिली नाही! तालिबानी राजवटीनेही भारताची अडचण लक्षात घेऊन मान्यतेचा आग्रह धरला नाही.भारताबरोबर सहकार्याचा करार केला. या करारात संरक्षण, व्यापार आणि खनिज संपत्तीच्या उत्खननासह २०१६ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण कराराचं पालन करण्याचंही ठरवण्यात आलं. रशिया वगळता अफगाणिस्तानातल्या तालिबानी राजवटीला अजून तरी अन्य कोणत्या देशाने अधिकृत मान्यता दिलेली नाही. पण, चीन त्या मार्गावर आहे. चीनपाठोपाठ पाकिस्ताननेही व्यूहरचना म्हणून या राजवटीला मान्यता दिली, तर त्यांना भारताचं महत्त्व वाटणार नाही. मुत्तकी यांच्या दौऱ्याचं वेळापत्रक आणि त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चा योग्य वेळी झाल्या असा निष्कर्ष त्यामुळेच निघतो.तालिबानी हिंसक, राजवट, महिलांच्या हक्कांविरोधी, मूलतत्त्ववादी आहेत खरे. पण, १९९६ चे तालिबानी आणि आत्ताचं त्यांचं दर्शन यात बराच फरक आहे. एका देशाचे कर्तेधर्ते म्हणून त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात आपलं स्थान शोधावं लागतं आहे. पाकिस्तानला वेगळं पाडण्यासाठी अन्य शेजाऱ्यांशी संबंध सुधारावे लागत आहेत. मुत्तकी यांनी दिल्लीत बोलावलेल्या पहिल्या पत्रकार परिषदेला महिला पत्रकारांना आमंत्रणच दिलं नव्हतं. पण, त्यावरून इथे सुरू झालेल्या टीकेची दखल घेऊन त्यांनी लगेच रविवारी दुसरी पत्रकार परिषद महिला पत्रकारांना रितसर आमंत्रण देऊन घेतली. 'महिला पत्रकारांना पहिल्यावेळी का बोलावलं नाही?' या प्रश्नाला उत्तर देतानाही धार्मिक कट्टरतावादी भूमिका न सांगता त्यांनी तांत्रिक कारण सांगितलं! व्यापक व्यासपीठावर वावरण्याची गरज निर्माण झाली, की प्रत्येकाचं अवकाश विस्तारतं या सार्वत्रिक अनुभवाचा प्रत्यय इथेही येतो आहे.अफगाणिस्तान हे लिथियमचं भांडार आहे. विजेवरच्या गाड्या किंवा अन्य ठिकाणी लागणाऱ्या आधुनिक बॅटरीसाठी लिथियम हा किती महत्त्वाचा धातू आहे, हे सांगायला नको. आज सगळ्या जगाचा या लिथियमवर डोळा आहे. रशिया, चीनचा विशेष. त्यात भारताने वेळीच हस्तक्षेप करायला हवा होता. मुत्तकी यांनी भारतीय उद्योजकांना अफगाणिस्तानात येण्याचं दिलेलं निमंत्रण भारताच्या दृष्टीने मोठी जमेची बाजू आहे. तालिबानी राजवटीला आंतरराष्ट्रीय मान्यतेसाठी तडजोडी कराव्याच लागणार आहेत. त्यात त्यांना त्यांची कट्टर, मूलतत्त्ववादी भूमिका सौम्य करावी लागेल, हे ओळखून भारताने वेगाने थोडी धाडसी पावलं टाकायला हरकत नाही. दक्षिण आशियात स्थिर, शांत, समन्वयाचं वातावरण हवं असेल, तर अफगाणिस्तानात तसं वातावरण राहणं, त्यांचे इतरांशी संबंध सुधारणं आवश्यक आहे. अफगाणिस्तानकडे स्वतःच सैन्यबळ असायला हवं ही भूमिकाही या सगळ्याला पुरकच ठरणार आहे. मुत्तकी यांच्या दौऱ्यानिमित्त या सगळ्याच मुद्द्यांवर चर्चा झाली, भारताची भूमिका स्पष्ट झाली, भारत अफगाणिस्तानात पुन्हा जवळ येण्याची प्रक्रिया सुरू झाली, हे सगळं 'योग्य वेळी-योग्य धोरण, योग्य भाषा-योग्य निर्णय' असंच घडलं आहे. त्यामुळे, त्याचं स्वागतच करायला हवं.

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद;म्हणणाऱ्या सहकार मंत्री यांच्या मुसक्या राज्यपालांनी आवराव्या!

महाराष्ट्राचे राजकारण आज कुठे पोहचले आहे!याची लाज वाटावी अशी परिस्थिती झाली आहे.एरवी या भुमित आपल्याला सौजन्यशिल, मृदू, प्रगल्भ भाषेसाठी राज्याची देशात चांगलीच ओळख होती.परंतु सन्मानजनक भाषेच्या बाबतीत ओळखल्या जाणाऱ्या या महाराष्ट्राला आज राजकारण्यांनी गलीच्छ केल्याचे स्पष्ट दिसून येते आणि त्याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.राज्याला असे कदापि वाटत नव्हते की,सहकारमंत्री बाबासाहेब पाटील एवढे निर्लज्जतेचा कळस गाठतील.परंतु आजकाल राजकीय पुढाऱ्यांच्या जिभेला हाडच रहालेले नाही ही बाब पाटील यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते.आपण काय बोलतो आणि कोणाबद्दल बोलतो याबद्दल थोडीशी जणांची नाहीतर मनाची लाज वाटायला पाहिजे! मंत्रीमहोदय म्हणतात निवडणूक जिंकण्यासाठी आम्ही काहीही आश्वासन देतो. लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे,असे वादग्रस्त वक्तव्य सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जळगाव येथील चोपडा येथे केले.शेतकरी वारंवार कर्ज माफी का मागतात याचा विचार पाटील यांनी कधी केला का? शेतकऱ्यांना शेती करतांना किती यातना व दुःख सोसावे लागतात याची जाण पाटलांना आहे का?ऊन, पाऊस, थंडी, वादळ,सुका दुष्काळ,ओला दुष्काळ,परिवाराच्या वेदना अशाप्रकारे राज्यातीलच नाही तर देशातील संपूर्ण शेतकरी या संपूर्ण घडामोडी मधुन आपल्या शेतात अन्नधान्यांचे उत्पादन काढत असतो.तेव्हा देशाच्या १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरत असते.परंतु सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी वादग्रस्त वक्तव्य करून राज्याच्याच नाही तर देशातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले व अपमान केला आहे.आज अती पाऊसामुळे मराठवाडा, विदर्भ, कोकण इत्यादीसह राज्यातील अनेक भागातील शेतकरी अत्यंत दुःखी व चिंतेत आहे.कारण त्यांची पिके तर गेलीच सोबत शेतातील माती सुध्दा वाहुन गेली व काही भागात जिवितहानी सुध्दा झाली.अशी भयावह परिस्थिती शेतकऱ्यांची आहे.राज्यात अतिवृष्टीमुळे ३६ पैकी ३१ जिल्हे अत्यंत प्रभावीत आहेत.त्याचप्रमाणे आजही राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजुनपर्यंत थांबलेल्या नाहीत.ह्या गोष्टींचा अभ्यास करण्यापेक्षा मंत्री शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करतात हे कसले लोकप्रतिनिधी व कसले मंत्री अशांना तर शेतकऱ्यांनी गाव बंदी करायला पाहिजे.शेतकरी हा अन्नदाता असुन देशाचा आधारस्तंभ आहे.त्यामुळे त्यांची सर्वतोपरी मदत होणे गरजेचे आहे.राज्यासह देशातील राजकीय पुढारी पाच वर्षांत करोडपती होतो व मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती गोळा करतो.परंतु शेतकऱ्यांचे तसे नसते आज शेतकरी मानाने, विचाराने व जमिनीने करोडपती असुन सुद्धा पैशांनी शुन्य आहे याची जाण सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी लक्षात ठेवली पाहिजे. चुकीचे वक्तव्य करून उचल्ली जिभ लावली टाळ्याला हा प्रकार राजकीय पुढाऱ्यांनी ताबडतोब बंद केला पाहिजे. कर्जमाफी ही बाबासाहेब पाटील यांच्या खिशातून होते का? किंवा यांच्या पगारातून होते.यांना तर असे वाटते की शेतकऱ्यांची कर्ज माफी म्हणजे आपले दिवाळे निघते की काय! त्यामुळे मंत्री बाबासाहेब पाटील थोडी शरम करा आणि असे घृणास्पद वक्तव्य करण्यापासून स्वतःची जिभ आवरा. आपण मंत्री आहात म्हणून काहीही बोललेले शेतकरी खपवुन घेणार नाही.राजकीय पुढारी व मंत्री पाटील यांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण एसीमध्ये बसता, लाखांच्या गाडीत फिरता, करोडोंच्या घरात रहाता,हवाई सफर करता,आलेशान खुर्चीवर बसता.परंतु शेतकरी हा मातीत राबतो,जमीनीवर रहातो, ऊन, पाऊस,थंडीची झळा सहन करतो तेव्हा त्याची शेती होते व शेतीतून उत्पन्न काढतो त्याला म्हणतात हाडामासाचा शेतकरी. फक्त खुर्चीवर बसल्याने,लोकप्रतिनिधी झाल्याने व खोटी समाजसेवा केल्याने कोणी समाजसेवक होत नाही, यासाठी मेहनत करावी लागते.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या बेजबाबदार वक्तव्यावरून असे वाटते की यांना शेतकऱ्यांशी काहीही देणेघेणे नाही फक्त मत लुबाडण्यासाठी शेतकऱ्यांना खोटे आश्वासन देवून दिशाभूल करून आपली राजकीय पोळी शेकण्याचे काम पाटील करीत आहे.त्यामुळे अन्नदाता शेतकरी यांची बेजबाबदार वक्तव्यातून पाटील यांनी केलेली विटंबना अत्यंत शर्मनाक व घृणास्पद असल्याने त्यांना कोणत्याही संविधानीक पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही असे मला वाटते.कारण मंत्री महोदयांनी लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी जगला तरच आपल्याला अन्न पुरवठा होईल.आज ग्लोबल वॉर्मिंगमुळे, युद्धजन्य परिस्थिती व बदलत्या हवामानामुळे राज्यातीलच नाही तर संपूर्ण जगातील शेतकरी अत्यंत दुःखी व चिंतेत आहे.त्यामुळे त्यांच्यापुढे नेहमीच जिवन मरणाचा प्रश्न उपस्थित होतो. राज्यासह देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या वाढल्याचे दिसून येते.फक्त मंत्री बनुन तोंडानी बोलने सोपी आहे पाटील साहेब शेताच्या धुऱ्यावर जाऊन पहा, चिखलात पाय रूजवुन पहा,एखाद्या शेतकऱ्यांच्या घराला भेट देऊन पहा त्यांच्या व्यथा पाहून सर्वसामान्यांच्या डोळ्यात अश्रू येतात आणि तुमच्या सारखे निर्लज्ज मंत्री तोंडात आले तसे ओकतात ही महाराष्ट्रा सारख्या सुसंस्कृत व संतभुमिला शोभा देत नाही. आपण राज्याला कलंकित करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे या निर्लज्ज मंत्र्यांच्या बाबतीत मी हेच म्हणेल की,आपण हाडामासाचे शेतकरी आहोत.त्यामुळे अशा मंत्र्यांना राज्यातील कोणत्याही गावात पाय ठेवण्याचा अधिकार नाही असे मला वाटते.यापुर्वी असेच वादग्रस्त वक्तव्य माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले होते तरीही ते आजही मंत्री आहेत याला काय म्हणावे समजत नाही!अशांना तर संपूर्ण संविधानीक पदावरून पायउतार करायला पाहिजे.आज महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही आणि अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना कर्जाचा सहारा घ्यावा लागतो.बदलत्या हवामानामुळे निसर्ग शेतकऱ्यांना पुर्णपणे साथ देत नाही अशा परिस्थितीत कर्जाचे ओझे दिवसेंदिवस वाढत जाते व शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते.सरकार निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना जाहीर करतात व राबवितात हा पैसा जनतेचा असतो मंत्र्यांच्या घरचा किंवा त्यांच्या खिशातील नसतो.त्यामुळे आज शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीत सापडला आहे त्यामुळे त्यांचे कर्ज माफ जर केले तर सरकारचे किंवा मंत्र्यांच्या खिशाला कोणती कात्री लागणार आहे?शेतकऱ्यांना जर कर्ज माफ झाले तर राज्याच्या जनतेमधून पैसा जाईल व याचे स्वागत राज्याची जनता सुध्दा करेल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी किंवा मंत्र्यांनी वादग्रस्त वक्तव्य देणे बंद करून ताबडतोब शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घ्यावा व वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या राज्यपालांनी व सरकारने आवराव्या.जय जवान जय किसान, जय हिंद.

रमेश कृष्णराव लांजेवार

# वारंवार हात धुतल्याने आपण आजारी पडू शकतो?

हात धुणे एक आवश्यक सवय आहे, ज्यामुळे अनेक आजारांपासून आपल्याला वाचता येते. आपण जेवणापूर्वी किंवा टॉयलेटवरुन आल्यानंतर कोणाला स्पर्श केल्यानंतर किंवा बाहेरुन घरात आल्यानंतर नेहमीच हात धुण्याचा सल्ला दिला जात असतो. आपला हात नेहमी मोबाईल, दरवाजा, नोटा, गाड्या आणि अन्य खाण्या पिण्याच्या वस्तूंना लागत असतो,त्यामुळे अनेक रोगजंतू त्वचेवर येतात. जर आपण हात नीट धुलते नाही तर ते शरीरात पोहचून आपल्याला आजारी पाडू शकतात.जागतिक आरोग्य संघटनेच्या आणि तज्ज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार नियमित आणि योग्य प्रकारे हात धुतल्याने डायरिया, सर्दी-पडसे, फ्लू, त्वचा संक्रमण, श्वासाशी संबंधित समस्या आणि कोरोनासारख्या आजारांना रोखता येते.त्यामुळे दरवर्षी १५ ऑक्टोबर हा ग्लोबल हँडवॉशिंग डे म्हणून साजरा केला जातो. लोकांना स्वच्छतेचा संदेश यातून दिला जातो. स्वच्छ हात धुणे हा आजारांपासून बचाव करण्याचा सोपा आणि परिणामकारक मार्ग आहे. परंतू खूप जास्त वेळा हात धुतल्यानेही आपल्याला नुकसान होऊ शकते. चला तर पाहूयातजास्त हात धुतल्याने आपण आजारी पडू शकतो का ? यामुळे शरीरात काय नेमके प्रॉब्लेम होतात.



जास्त हात धुतल्याने आपण आजारी पडतो ?

हात धुण्याची सवय चांगली आहे. परंतू जर जास्त वेळा हात धुतले तर शरीरात काही समस्या निर्माण होऊ शकतात. आपल्या त्वचेवर काही नॅचरल ऑईल आणि गुड बॅक्टेरियात असतात ते आपले रक्षण करत असतात. बाहेरील जंतूशी लढण्यासाठी ते आपली मदत करतात. जेव्हा आपण अधिक वेळा साबण आणि हँडवॉशचा वापर करतो तेव्हा त्वचेचे नैसर्गिक संरक्षण हळूहळू निघून जाते. यामुळे त्वचा निष्तेज आणि बेजीव होते, हात लाल होतात, खाज आणि त्वचेला भेगा पडू लागतात. काही लोकात एक्झिमा सारख्या समस्या होतात. त्वचा फाटल्याने बॅक्टेरिया शरीरात सहज प्रवेश करतात. त्यामुळे इंफेक्शनचा धोका वाढतो. वारंवार हात धुतल्याने शरीरात या समस्या होतात.

१. त्वचेत जळजळ आणि खाज : वारंवार साबणाने हात धुतल्याने त्वचेचा वरच थर निघून जातो. त्यामुळे त्वचा चुरचुरते,खाज येते, काही वेळा भेगा देखील पडतात.

२. नॅचरल ऑईलचे नुकसान: आपल्या त्वचेतील नैसर्गिक ऑईल हातांना सॉफ्ट बनवते, जर वारंवार हात धुतले तर ऑईन निघून जाते. त्वचा रुक्ष आणि निर्जिव होते

३. डर्मेटायटिस: खूप जास्त हात धुतल्याने संपर्क डर्मेटायटिस होऊ शकतो. त्यामुळे स्कीनमध्ये सूज, खाज आणि लालसरपणा होता.

४. एक्झिमाची समस्या: ज्या लोकांना आधीपासून एक्झिमा आहे, त्यांच्यासाठी वारंवार हात धुण्याने गंभीर समस्या होऊ शकते. हा आजार आणखीन वाढू शकतो. त्यामुळे हाताला सारखे जळजळणे आणि चुरचुरणे सुरु होऊ शकते.


५. संक्रमणाचा धोका वाढतो : जेव्हा त्वचा फाटते किंवा त्याचे भेगा पडतात. तेव्हा बॅक्टेरिया शरीरात सहज जाऊ शकतात.त्यामुळे संक्रमणाचा धोका आणखीन वाढतो.

**केव्हा आणि कसे हात धुवावेत ?**

हात धुणे गरजेचे आहेत. परंतू आवश्यक असेल तेव्हाच ते धुवावेत. टॉयलेटला जाऊन आल्यानंतर, जेवणापूर्वी, बाहेर घरात आल्यानंतर, आजारी व्यक्तीला स्पर्श केल्यानंतर शिंकणे किंवा खोकल्यानंतर हात धुणे गरजेचे आहे. किमान २० सेंकद वाहत्या पाण्याखाली साबणाने हात धुवावे, बोटांचे मधले भाग, नखांचा खालचा भाग आणि हाताचा भाग नीट चोळून धुवावा.

# दिवाळीतील आनंदाचा शिधा गेला कुठे?

दिवाळी म्हणजे वर्षातुन येणारा एक महत्त्वाचा आणि आनंदाचा सण असतो.त्याचप्रमाणे दिवाळीला सर्वत्र झगमगाट व उत्साहाचे वातावरण दिसून येते.परंतु सरकारने आनंदाचा शिधायोजनेवर ब्रेक लावल्याने गोरगरिबांच्या सणांमध्ये ब्रेक लागुन अंधक्काराचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.२०२२ पासुन सरकारने आनंदाचा शिधा हा उपक्रम राबविला होता. परंतु या उपक्रमाला आता ग्रहण लागल्याचे दिसून येते. त्यामुळे गेल्या दीड वर्षापासून दिवाळीत मिळणारा आनंदाचा शिधा सरकारने बंद करून गोरगरीब जनतेवर मोठा अन्याय केल्याचे दिसून येते.निवडणुका झाल्या आणि मुख्यमंत्री बदलला म्हणजे योजनाही बदलतात की काय असे वाटायला लागले आहे.तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारने २०२२ मध्ये आनंदाचा शिधाहा उपक्रम सुरू केला होता.या योजनेत केवळ १०० रूपयामध्ये एक किलो साखर, एक किलो चणाडाळ, एक लिटर खाद्यतेल व एक किलो रवा असे आवश्यक साहित्य दिले जात होते.परंतु गेल्या दीड वर्षापासून या योजनेला सरकारने खो दिला आहे.परंतु गोरगरीब लाभार्थ्यांना आताही अपेक्षा आहे की दिवाळीचा शिधा मिळेल.परंतु सध्यातरी असे वाटत नाही की सरकार लाभार्थ्यांना आनंदाचा शिधादेईल.आताही ८० टक्के शिधापत्रिकाधारक आनंदाचा शिध्याच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारला समजायला पाहिजे की महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशा परिस्थितीत सणासुदीला सरकारने जनतेच्या जखमेवर फुंकर घालायची तर मीठ चोळण्याचे काम करतांना दिसत आहे आणि या कठीण परिस्थितीचा सामना गरीब व सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात करावा लागतो




आहे.परंतु सणासुदीच्या दिवसांत जर सरकार गरीबांचा आधार बनत नसेल तर अशा योजनांचा काय फायदा!आनंदाचा शिधा बंद केला म्हणजे राज्यात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही.कारण राज्यातील संपूर्ण जनता राजकीय पुढाऱ्यांसारखी श्रीमंत नाहीत.अत्योदय कार्डधारक, प्राधान्य कुटुंबकार्डधारक अशाप्रकारे संपूर्ण शिधापत्रिकाधारक यांना ऐन सणासुदीच्या काळात सरकारने सुरू केलेली योजना अचानक बंद करीत असेल तर गरीबांच्या व शिधापत्रिकाधारकांच्या पायावर कुऱ्हाड मारण्याचे काम सरकार करीत आहे असेच म्हणावे लागेल.कारण राज्यात अतिवृष्टीमुळे मराठवाडा, कोकण, विदर्भासह अनेक क्षेत्र प्रभावीत झाले आहेत प्रामुख्याने ३६ जिल्ह्यांपैकी ३१ जिल्हे जास्त प्रभावीत होवून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहेत.त्यांना सरकारने सर्वोतोपरी मदत करावी आणि केलीच पाहिजे.परंतु अशा कठीण प्रसंगी सरकारच्या योजनेअंतर्गत दिला जाणारा आनंदाचा शिधा शेतकऱ्यांना व शिधापत्रिकाधारकांना सरकारने ताबडतोब द्यायला हवा.यामुळे थोडा का होईना दिवाळीचा सण साजरा करण्यास मदत होईल असे मला वाटते.गोरगरीबांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर महागाईच्या काळात हा शिधा दिलासा देणारा ठरत होता. शंभर रूपयात मिळणारे पॅकेज सणाचा गोडवा वाढवत असे.मात्र गणेशोत्सव, नवरात्र, दसरा संपूनही शिधा वाटप झालेला नाही आणि आता दिवाळीला सरकार शिधा वाटप करते की नाही यात मोठी शंका निर्माण होत आहे.कारण दिवाळी फक्त आठ दिवसांवर येऊन ठेपली आहेत आणि सरकारने आनंदाचा शिधा कुठे नेऊन ठेवला अजुनही कळेनासे झाले आहे.त्यामुळे आनंदाचा शिधा अधांतरी असल्याचे स्पष्ट दिसून येते.राज्यात पैशाला काहीच कमी नाही कारण राज्यातील मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडों रूपयांची अमाप चल-अचल संपत्ती आहे.त्यांनी जर खरोखरच समाजाला मदत करण्याचे ठाणले तर अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा सहज देवु शकतात यात तिळमात्र शंका नाही.परंतु या करीता मोठे काळीज हवे परंतु ते राजकीय पुढाऱ्यांनमध्ये दिसतं नाही ही महाराष्ट्राची राजकीय पुढाऱ्यांच्या प्रती शोकांतिका म्हणावी लागेल. राजकीय पुढारी फक्त नावालाच लोकप्रतिनिधी, जनप्रतिनीधी व समाजसेवक आहेत कृतीत मात्र प्रश्नार्थक चिन्ह उपस्थित होतो.मागील दिवाळीत अंत्योदय प्राधान्य व शेतकरी कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना रेशन दुकानातुन साखर,तेल,रवा, चणाडाळ, मैदा,व पोहे देण्यात आले होते.मात्र यंदा शासनस्तरावर यांच्यासाठी कोणताही निर्णय झालेला दिसत नाही ही सुद्धा गंभीर बाब आहे. त्यामुळे सरकारला विनंती आहे की वाढती महागाई, शेतकऱ्यांवर आलेली आपत्तीजनक परिस्थिती या संपूर्ण गोष्टींचा विचार करून दिवाळी साजरी करण्याच्या दृष्टीने सरकारने ताबडतोब आनंदाचा शिधा वाटप सुरू केले पाहिजे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**

# संघर्षातून घडलेलं व्यक्तिमत्त्व शेख मुदस्सर उर्फ 'बबलू भय्या'!

## समाजकार्याच्या बळावर जनतेच्या मनात ठसा उमटवणारा लोकनायक

दैनिक वादळ वार्ता
**नेकनूर । प्रतिनिधी**

परिस्थितीशी झुंज देत स्वतःचं नशीब घडवणाऱ्या आणि समाजसेवेच्या माध्यमातून लोकांच्या मनात स्थान निर्माण करणाऱ्या शेख मुदस्सर उर्फ बबलू भाया यांचं नाव आज नेकनूर परिसरात चर्चेचा विषय बनलं आहे.सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले बबलू भय्या यांनी लहान वयातच वडिलांचं छत्र गमावलं, त्यानंतर मोठ्या भावाचं निधन झालं – पण या सर्व दुःखांवर मात करून त्यांनी आयुष्याला नवी दिशा दिली. परिस्थिती हीच खरी शिक्षक असते हे आपल्या कर्मातून त्यांनी सिद्ध करून दाखवलं.

**समाजासाठी समर्पित प्रवास**

बबलू भय्या यांनी स्वतःच्या अडचणींना कधीही समाजकार्यात अडथळा बनू दिलं नाही. आर्थिक मर्यादा असूनही त्यांनी गरीब व गरजूंसाठी मदतीचा हात पुढे केला, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिलं, धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांना हातभार लावला आणि समाजात एकता, सौहार्द आणि बंधुभाव वाढवण्याचं काम सातत्याने केलं.

त्यांचा आपुलकीचा, लोकाभिमुख स्वभाव आणि सर्व धर्म, जाती-पंथातील लोकांशी जपलेलं जिव्हाळ्याचं नातं हेच त्यांच्या लोकप्रियतेचं खरं रहस्य आहे. कोणीही अडचणीत असलं की बबलू भय्या सर्वप्रथम धावून येतात असं म्हणणं आज प्रत्येक नेकनूरकराच्या तोंडी ऐकायला मिळतं.

**नेकनूर गणात नवा उत्साह**

आगामी पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बबलू भय्या यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांच्या साधेपणा, लोकसंपर्क आणि समाजसेवेच्या कार्यामुळे जनतेत एक नवी आशा निर्माण झाली आहे. तरुण वर्ग विशेषतः त्यांच्या पाठिशी ठामपणे उभा आहे.

नेकनूर गणातील जनतेचं म्हणणं आहे की, बबलू भाया आले म्हणजे लोकांमध्ये नवा उत्साह आणि आत्मविश्वास जागतो.

त्यांच्या संघर्षातून समाजासाठी झटणाऱ्या कार्याने ते आज खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील नेता म्हणून उदयास आले आहेत.



'मूळवाट' क्रांती! माकडकुंडात CCT कामाचा धुमधडाका

# १९३ मजुरांच्या हाताला गावातच काम, स्थलांतर थांबणार!

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रवींद्र वळवी**



जिल्हाधिकारी डॉक्टर मिताली सेठी यांच्या दूरदृष्टीच्या 'मूळवाट' संकल्पनेतून दिनांक १५ roji माकडकुंड (तालुका धडगाव) येथील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रुप ग्रामपंचायत कात्री अंतर्गत, मौजे माकडकुंड येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी, CCT कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या जलसंधारणाच्या महत्त्वपूर्ण कामामुळे एकाच वेळी जलसंवर्धन, मृदसंवर्धन आणि शेती उत्पादन वाढीचे तिहेरी उद्दिष्ट साधले जाणार आहे.

ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू झालेल्या या कामामुळे गावातील सुमारे १९३ मजुरांच्या हाताला गावातच रोजगार मिळाला आहे. या कामाच्या माध्यमातून मजुरांचे शहरांकडे होणारे स्थलांतर थांबण्यास मोठी मदत होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच संदिप वळवी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी उपसरपंच सुभाष वळवी, MNREGA अधिकारी अजय पावरा, राहुल तडवी, ग्राम रोजगार सहाय्यक विनोद वळवी यांच्यासह अनेक मान्यवर व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

या योजनेबद्दल गावकऱ्यांनी मनःपूर्वक समाधान व्यक्त केले. या योजनेमुळे रोजगाराची संधी गावातच उपलब्ध होत असल्याने, आता बाहेरगावी जाऊन काम करण्याची गरज राहणार नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच, या उपक्रमामुळे शेतीसाठी पाण्याची साठवणूक वाढेल आणि जीवनमान सुधारेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. 'मूळवाट' उपक्रमातून माकडकुंडात सुरू झालेले हे उउढ चे काम, गावकऱ्यांसाठी रोजगार आणि समृद्धीची नवी वाट निश्चितच खुली करेल.

# पंजाबमधील पूरग्रस्तांना एक लाखाची मदत

## महाराष्ट्रात मुख्यमंत्री निधीसाठीही मदत देणार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पंजाबमध्ये उसळलेल्या महापुरात उध्वस्त झालेल्या नागरिकांना मदतीचा हात म्हणून विविध संस्थांनी एकत्र येत सुप्रसिद्ध लेखक डॉ .विजय पंडित यांच्या नेतृत्वाखाली एक लाख रूपयांची मदत केली आहे.या संस्था लवकरच मुख्यमंत्री मदत निधीमध्ये देखील मदत देणार असल्याचे डॉ.पंडीत यांनी सांगीतले.



पंजाब मध्ये आलेल्या महापूरामुळे दळणवळण व्यवस्था बाधित झाली असून येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या नागरिकांना मदत म्हणून ओम शिवम सत्संग ट्रस्ट, संस्कृती संगम गोल्डन ग्रुप, विश्व ब्राह्मण समाज, व एम जे चॅरिटेबल ट्रस्ट या सामाजिक संस्थांनी आपल्या मदतीचा एक लाख रूपयांचा धनादेश पंजाब मधील एक गाव दत्तक घेणाऱ्या श्री गुरुसिंह सभेचे अध्यक्ष अमरसिंह नाखुदा यांच्याकडे सुपूर्द केला.यावेळी रामचंद्र पांडे, विजय त्रिपाठी, दिलबाग सिंग, अरुण दुबे, सतनाम सिंग, श्रीचंद केसवानी, सुनील कुकरेजा, विश्वंभर द्विवेदी, शिवानी गोरे, मनोज तिवारी, संगीता चिखले, नाना चिखले, गुलाब ताई कोकणे, सुरेश गुप्ता, बेबी आपा, मनीषा राव, श्याम तुळवे, अरविंद जोशी, स्वप्नील करपे इत्यादी मान्यवर समाजातील उपस्थित होते.महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात उद्भवलेल्या पूरग्रस्ताच्या मदतीसाठी लवकरच मुख्यमंत्री मदत निधीमध्ये मदत देण्यात येणार असल्याची माहीती डॉ.विजय पंडित यांनी दिली.

## आदर्श प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानेश्वर माऊली व सरस्वती महिला शिक्षण प्रसारक मंडळ ,बीड संचलित आदर्श प्राथमिक व माध्यमिक विद्यालय बीड येथे दि. १५/१०/२०२५ बुधवार रोजी राष्ट्रपती मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे मा.डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीमती डोके मॅडम,श्रीमती औटी मॅडम , श्रीमती उषा मॅडम व श्रीमती शेळके मॅडम यांनी मिसाईल मॅन डॉ. एपीजे, अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे पूजन करुन विनम्र अभिवादन केले. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या कार्याविषयी शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक श्रीमती औटी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैज्ञानिक डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे कार्य सांगितले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले.याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक तसेच सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून डॉ .एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात केली.

## समर्थ राहुल शेटे याने स्केटिंग मध्ये विभागीय स्तरीय शालेय स्पर्धेमध्ये प्रथम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



वीर हनुमान शिक्षणसंस्था संचलित पुरुषोत्तम दादा सोनवणे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी तालुका केज जिल्हा बीड चा विद्यार्थी समर्थ राहुल शेटे याने स्केटिंग या खेळ प्रकारा मध्ये विभागीय स्तरीय शालेय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला व त्याची राज्य स्तरावर निवड झाली असुन संस्थेचे सचिव श्री.राहुल पुरुषोत्तम सोनवणे, संस्थेचे संचालक श्री.रवी सोनवणे,संतोष सोनवणे व क्रीडाशिक्षक मार्गदर्शक प्रा. दत्तात्रय जाधव, मुख्याध्यापक श्री.लोमटे पी.एच व शिक्षक वृंद व इतर कर्मचाऱ्यांनी या यशाबद्दल समर्थ शेटेचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रायगडच्या राजकारणात नवी समीकरणं सुरेंद्र म्हात्रेंचा विजयमार्ग मोकळा!

दैनिक वादळ वार्ता
**अलिबाग । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आरक्षण सोडतीनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांचा निवडणुकीचा मार्ग अखेर खुला झाला आहे. दि.१३ रोजी पार पडलेल्या आरक्षण सोडतीनंतर अनेक इच्छुकांच्या नशिबाची लॉटरी लागली, तर काहींच्या आशांवर आरक्षणाची मर्यादा पडली. मात्र या सगळ्या घडामोडींमध्ये सुरेंद्र म्हात्रे यांच्यासाठी राजकीय समीकरणं अनुकूल ठरल्याचं स्पष्ट दिसत आहे.



मागील जिल्हा परिषदेत विरोधी पक्षनेते म्हणून प्रभावी भूमिका बजावणारे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, दृढ नेतृत्व, लोकाभिमुख धोरणं आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यासाठी ओळखले जातात. आगामी निवडणुकीत शिवसेनेचा भगवा पुन्हा एकदा रायगड जिल्हा परिषदेत फडकवू असा आत्मविश्वास शिवसैनिकांमध्ये ओसंडून वाहत आहे.शिवसेनेचा झेंडा जनतेच्या मनात पुन्हा रुजवण्याच्या तयारीला वेग आला असून, पक्षांतर्गत संघटनाही सज्ज झाली आहे. सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली विकास, पारदर्शकता आणि जनतेच्या प्रश्नांवर थेट लढा या तत्त्वांवर आधारित प्रचार मोहीम राबवली जाण्याची शक्यता आहे.राजकीय जाणकारांच्या मते, रायगडच्या आरक्षण सोडतीने फक्त मतदारसंघांचे गणित नाही, तर सत्तासमीकरणांचं गणितही बदललं आहे – आणि या समीकरणात सुरेंद्र म्हात्रेंची ताकद पुन्हा एकदा निर्णायक ठरणार आहे.

# परप्रांतीयांच्या मुद्द्यावर विरोधकांनी राज्य निवडणूक आयोगाला धरले धारेवर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाची भेट घेऊन परप्रांतीय मतदारांच्या दुबार नोंदणीचा मुद्दा उपस्थित केला. ही नोंदणी कायद्याने गुन्हा असून, मुंबई-पुण्यात मोठ्या प्रमाणात होत असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोगाने 'डी-डुप्लिकेशन' पद्धत वापरून ही दुबार नोंदणी रोखावी, अशी मागणी विरोधकांनी केली. तसेच, १८ वर्षांवरील तरुणांच्या मतदान हक्काबाबतही राज्य निवडणूक आयोगाला सवाल करीत धारेवर धरले.राज्यातील मतचोरीचा मुद्दा थंडावलेला असला तरी या मुद्द्यावरून विरोधकांनी चांगलेच रान पेटवलं आहे. आज विरोधी पक्षांच्या शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. एस. चोकलिंगम यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाचे विविध मुद्द्यांकडे लक्ष वेधले. एक निवेदन देऊन विरोधकांनी आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केली. यावेळी परप्रांतिय मतदारावरूनही विरोधी पक्षाने निवडणूक आयोगाचं लक्ष वेधलं आहे.



यावेळी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, जयंतराव पाटील, बाळासाहेब थोरात, अनिल देसाई, अनिल परब, जयंत पाटील (शेकाप), शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, रईस शेख, संदीप देशपांडे, आदित्य ठाकरे, कॉ. प्रकाश रेड्डी यांनी आज निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक आयुक्तांना एक निवेदन दिलं आहे. त्यात सहा मुद्द्यांकडे त्यांनी राज्य निवडणूक आयुक्तांचे लक्ष वेधलं आहे. त्यातही सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे परप्रांतीय मतदारांचा मुद्दाही या निवदेनात घेण्यात आला असून निवडणूक आयोगाला त्यावर पर्याय सुचवला आहे.राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण-डोंबिवली, रायगड नाशिक अशा शहरात मोठ्या प्रमाणावर परराज्यातून कामासाठी येणाऱ्यांचा भरणा आहे. यातील अनेक मतदार त्यांच्या मूळच्या राज्यात देखील मतदार असतात आणि इथे पुन्हा महाराष्ट्रात पण मतदार म्हणून स्वतःची नोंदणी करून घेतात. मुळात दोन दोन ठिकाणी मतदार म्हणून नोंदणी करणे, मतदान करणे हा कायद्याने गुन्हा आहे, याकडे शिष्टमंडळाने लक्ष वेधले.

मतदार नोंदणी दुबार होऊ नये,याची जबाबदारी निश्चितच निवडणूक आयोगाची आहे. पण अशी दुबार नोंदणी काढण्यासाठी तेथील निवडणूक आयोग नक्की काय प्रयत्न करत आहे? जर बिहारमध्ये दुबार नाव नोंदणी काढण्यासाठी तेथील निवडणूक आयोगाने विशेष मोहीम राबवली तर मग महाराष्ट्रात तसा प्रयत्न स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी का दिसत नाही आहे? दुबार नोंदणी काढण्यासाठी 'डी-डुप्लिकेशन' पद्धतीचा वापर करावा, असा पर्यायही विरोधकांनी या निवेदनातून सूचवला आहे. खासदार अरविंद सावंत यांनी राज्य मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांच्या निर्दर्शनास आणून दिले की, खरतर दुबार मतदाराने जिथे राहतो तिथे मतदान केलं पाहिजे. दुबार मतदाराच नाव का नाही डिलिट करणार? हे सगळ्यात धक्कादायक होतं. वोटचोरी सुरु होते ते इथून. आमच्या सोबत पनवेलचे आमदार होते, त्यांनी २८ हजार दुबार मतदारांची नाव दाखवली. त्यात ११,०६६ मतं एकाच मतदारसंघातली होती. काय कारवाई केली? काही नाही असे अरविंद सावंत यांनी सांगितले. .मुंबईसह महानगरात इतर राज्यातील प्रचंड मुलं आहेत. त्यांची नावं इथेही आहेत आणि गावी सुद्धा आहेत. ती दुबार नाव कोण शोधणार? असा सवाल अरविंद सावंत यांनी विचारला. व्हीव्हीपॅट मशीन बाबत धक्कादायक उत्तर दिलं. नवीन मशीनला व्हीव्हीपॅट नाही. नवीन मशीनला व्हीव्हीपॅट अटॅच करता येणार नाही. म्हणजे उद्याची चोरी कशी करायची याच प्लानिंग केलेलं दिसतं आहे. निवडणूका लागण्याआधी जुलैमध्ये मतदार नोंदणी का बंद केली? असे प्रश्न अरविंद सावंत यांनी विचारले. नव्याने १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या तरुणांच्या मतदानाचा मुद्दाही उचलण्यात आला आहे.आज जी मुलं १८ वर्षाची होणार आहेत. त्यांना मतदानाचा हक्क नसणार आहे. मग या मुलांनी पाच वर्ष थांबायचं का? त्यांची मतदान नोंदणी का होत नाही? असा सवालही निवेदनात करण्यात आला आहे.

# समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती समाजासाठीचा लढा सुरूच ठेवणार-धनंजय कुलकर्णी

## भगवान परशुरामाच्या तपोभूमीतून लढ्यास सुरुवात



दैनिक वादळ वार्ता
**चिपळूण | प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून ब्राह्मण समाजाच्या हिताच्या न्याय मागण्यासाठी ना नेता,ना पदाधिकारी एक ब्राह्मण नेक ब्राह्मण हे ब्रिद घेऊन कार्यरत आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळ या संघर्षाचे यश असले तरी उर्वरित मागण्यासाठी पाठपुरवा करणेसाठी संघर्ष समितीची राज्यव्यापी बैठक रविवारी भगवान परशुरामाची तपोभूमी चिपळूण येथे पार पडली. परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केल्या बद्दल सरकारचे अभिनंदन करून उर्वरित मागण्या साठी पुन्हाएकदा सरकार दरबारी लोकशाही मार्गाने जाण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला व हा लढा सर्व माफक आणि न्यायिक मागण्या मान्य होईपर्यंत या वेळी सर्वानुमते घेण्यात आला.

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून ब्राह्मण समाजाच्या हिताच्या न्याय मागण्यासाठी ना नेता,ना पदाधिकारी एक ब्राह्मण नेक ब्राह्मण हे ब्रिद घेऊन कार्यरत आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन होणे हे या लढ्याचे मोठे यश असले तरी देखील समाजाच्या उर्वरित मागण्याबाबत अजून कसलेच निर्णय घेण्यात आले नाही.या बाबत संघर्ष समितीच्या बैठका झाल्यानंतर पुढील मागण्यासाठी पाठपुरावा करण्यासाठी भगवान परशुराम यांची तपोभूमी चिपळूण येथे रविवार दि.१२ ऑक्टोबर रोजी भगवान परशुराम यांचे दर्शन घेऊन या लढ्यास सुरुवात करण्यात आली. लढ्याची दिशाठरविण्यात आली. लोकशाही मार्गाने समाजाच्या उर्वरित मागण्यासाठी शासकीय व प्रशासकीय पातळीवर निवेदन देऊन मागण्यांचे स्मरण करून देण्यात येणार आहे.टप्याटप्याने समाजाच्या उर्वरित मागण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असून वेळ पाडल्यास शासकीय प्रशासकीय पातळीवर आंदोलने करण्याचानिर्णय देखील या राज्यव्यापी बैठकीत घेण्यात आला. संघर्ष समिती मुख्य समन्वयक धनंजय कुलकर्णी,प्रमोद पुसरेकर, दिपक रननवरे,श्रीकांत जोशी,अनिल दीक्षित धुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला. सुरुवातीस भगवान परशुराम यांना सामूहिक अभिषेक,महाआरती करण्यात आली.त्यांच्या चरणी नतमस्तक होवून राज्यव्यापी बैठक घेण्यात आली या बैठकीस प्रज्ञाताई भिडे मुंबई, अर्चना सरुडकर बदलापूर, भीमाशंकर कुलकर्णी औसा,महेश महाराज भट धुळे,योगेश जानतीकर लातूर, हेमंत शेषराव कुलकर्णी,अंबड जि.जालना,वैभव रामचंद्र कुलकर्णी,संजय जोशी जालना,मधुसूदन दंडारे जालना,प्रसाद पाटील जालना,मोहनराव मुळे जाफराबाद अनंतमहाराज जाफराबाद,लक्ष्मीकांत बुगदाने टेंभुर्णी,नंदकुमार काळें टेंभुर्णी,भुषण जोशी धुळे,राहुल याज्ञिक धुळे,

विलासराव कुलकर्णी पिसादेवी,विनोद महाराज कुलकर्णी पिसादेवी, जीवन पाटील,अभिषेक समुद्रे ठाणे पिसादेवी श्री. विनोद कृष्णशास्त्री महाराज,श्याम रामपूरकर काका,विलास कुलकर्णी, मोहन रेघे,जीवन पाटील यांच्यासह राज्यभरातून संघर्ष समितीचे समन्वयक उपस्थित होते.

### वनहक्क दाव्यांच्या जलद निपटाऱ्यासाठी नंदुरबार प्रशासन सक्रिय


# ५१० दाव्यांवर जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी

## पारदर्शकतेच्या माध्यमातून जनतेस न्याय देण्याच्या धोरणाला बळकटी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

वनहक्क कायद्यांतर्गत प्रलंबित असलेल्या दाव्यांचा निपटारा जलदगतीने आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने व्हावा, यासाठी नंदुरबार जिल्हा प्रशासन सक्रिय झाले आहे. याच अनुषंगाने, जिल्हास्तरीय समितीची महत्त्वपूर्ण दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी तहसील कार्यालय, अक्राणी येथे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीमध्ये एकूण ५१० वनदाव्यांची सविस्तर सुनावणी घेण्यात आली. प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या जमिनीवरील पारंपरिक हक्क लवकरात लवकर प्राप्त व्हावेत, यावर



प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण आणि वन क्षेत्रातील नागरिकांना न्याय देणे, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी बैठकीदरम्यान सर्व संबंधित अधिकाऱ्यांना अत्यंत स्पष्ट निर्देश दिले. अर्जांची सत्यता आणि भूअभिलेख पडताळणी काटेकोरपणे करावी. त्याचबरोबर, पात्र लाभार्थ्याला हक्कपत्र मिळण्यास कोणताही विलंब होऊ नये आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता व जबाबदारीचा उच्च दर्जा राखावा, असे निर्देश त्यांनी दिले.यावेळी बैठकीस सुहास चव्हाण (उपवनसंरक्षक), देवेंद्र पाटील (सहा. प्रकल्प अधिकारी), ज्ञानेश्वर सपकाळे (तहसीलदार) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि अनेक दावेदार प्रत्यक्ष उपस्थित होते.जिल्हास्तरीय समितीद्वारे घेण्यात आलेल्या या विशेष सुनावणी उपक्रमामुळे, पारंपरिक जमिनीवरील हक्कांबद्दल नागरिकांना खात्री मिळत आहे. प्रशासनाचा हा सक्रिय आणि जबाबदार दृष्टिकोन शासनाच्या जनतेस न्याय, प्रशासन पारदर्शक या धोरणाला स्थानिक पातळीवर अधिक बळकटी देत आहे. सदर बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी तहसिल कार्यालय अक्राणी व जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## बॉम्बे स्टॉक एक्सचेंज बी.एस.ई. मार्फत श्री संत भगवान बाबा शासकीय आय.टी.आय.कॉलेज येथे कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा | प्रतिनिधी**

श्री संत भगवान बाबा शासकीय आय.टी.आय. कॉलेज पाटोदा येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच बॉम्बे स्टॉक (बी.एस.ई.) च्या माध्यमातूनआय.टी.आय. च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. व यासोबत भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त अभिवादनचा कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य माननीय श्री विजय बेलेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच बी.एस.इ.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँक तसेच पोस्ट ऑफिस मध्ये असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. एस.एस.जगताप सर,एस. एम.वाकपांजर सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले व प्रा.पी.ए.एस शेख सर यांनी सूत्रसंचालन केले.तसेच याकार्यक्रमास प्रा.सौ.एम.व्ही पाळवदे मॅडम,प्रा.कु.जे.एम. धुमाळ मॅडम व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कवळी येथे आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन



दैनिक वादळ वार्ता
**औसा | खालेद काझी**

औसा तालुक्यातील मौजे कवळी येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आणि माजी वसुंधरा अभियान अंतर्गत स्वस्त नारी सशक्त परिवार या उपक्रमांतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले. गावातील महिलांमध्ये हिमोग्लोबिन तपासणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.या शिबिरात आरोग्य विभागातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली रक्त तपासणी, हिमोग्लोबिन मापन, व स्त्रियांच्या आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. शिबिरात मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमास सरपंच राहिबाई लहू जगताप, उपसरपंच सुनिता महादेव जगताप, सदस्य विनया गोविंद शिंदे, स्वप्नाली गायकर, सुशिलाबाई शेषराव माळी, तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.गावातील नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. सामाजिक संस्थांचे व आरोग्य विभागाचे सहकार्य या उपक्रमाच्या यशामागे महत्त्वाचे ठरले.

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाला जिल्हाधिकाऱ्यांनी दिली तातडीची दिशा

# नंदुरबारच्या धडगाव येथील क्लब फूट पीडित बालकाच्या उपचारासाठी तत्काळ अंमलबजावणीचे आदेश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या प्रशासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संवेदनशील पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिनांक १४ रोजी धडगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा वावी येथे अचानक भेट देऊन (आर.बी.एस.के.) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी मोहिमेची बारकाईने पडताळणी केली.

या भेटीदरम्यान, डॉ. सेठी यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य नोंदी आणि प्रलंबित उपचार प्रकरणांचा सखोल आढावा घेतला. यात, दुसरी इयत्तेतील एका



बालकाच्या 'क्लब फूट' या गंभीर विकारावरील प्रलंबित शस्त्रक्रियेचा विषय त्यांच्यासमोर आला.प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, जिल्हाधिकारी मॅडम यांनी (आर.बी.एस.के.) टीम धडगावमधील वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास भामरे आणि डॉ. निलेशा पाडवी यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. विलंब न करता, त्यांनी आरोग्य विभागाला तातडीचे आणि स्पष्ट निर्देश दिले.बालकाच्या आरोग्य आणि भविष्यासाठी आवश्यक त्या सर्व उपचारांची अंमलबजावणी तातडीने आणि जबाबदारीने पूर्ण करण्यात यावी. कोणताही विलंब न होता शस्त्रक्रियेची प्रक्रिया सुरू व्हावी, असा आदेश डॉ. सेठी यांनी दिला.प्रशासनाच्या भूमिकेवर जोर देत जिल्हाधिकारी म्हणाल्या, प्रत्येक बालक आरोग्यदायी आणि सक्षम समाजाचा पाया आहे. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये प्रशासनाने मानवतेच्या भावनेने तातडीने प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

या महत्त्वपूर्ण निर्देशामुळे, (आर.बी.एस.के.) टीमला बालकाच्या आरोग्यावर नियमित पाठपुरावा करणे, जिल्हा आरोग्य विभागाला शस्त्रक्रिया प्रक्रियेस सर्व प्रशासनिक सहाय्य पुरवणे आणि पालकांना योग्य मार्गदर्शन करणे बंधनकारक झाले आहे. जिल्हाधिकारींच्या या भेटीमुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवांबाबत प्रशासनाची सजगता, संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.

# 'जीवन शिक्षण विद्यालय'चा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत झेंडा फडकला! केजच्या खेळाडूंची दमदार कामगिरी विभागीय स्पर्धेसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत 'जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केज' येथील खेळाडूंनी आपला ठसा उमटवत घवघवीत यश संपादन केले.

१४ वर्ष मुलांच्या गटात चि. अथर्व शिवराज घुले यांनी गोळाफेक स्पर्धेत प्रथम आणि २०० मीटर धावण्यामध्ये तृतीय क्रमांक मिळवला. चि. रोनक रणधीर ठोके यांनी २०० मीटर धावण्यात द्वितीय आणि लांब उडीत द्वितीय स्थान पटकावले.चि. विष्णू सुधाकर केदार यांनी १०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवला.तर १४ वर्ष मुलींच्या गटात कु. धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून विद्यालयाचा मान वाढवला.

या सर्व उल्लेखनीय कामगिरीमागे क्रीडा मार्गदर्शक श्री. साजेद पठाण सर, श्री. भीमाशंकर तोंडसे सर, सौ. अश्विनी दळवे मॅडम आणि श्री. किशोर मस्के सर व धम्मपाल गायकवाड सर यांचे परिश्रम व मार्गदर्शन मोलाचे ठरले.

या विजेत्या खेळाडूंना आगामी विभागस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळाली असून संस्थेचे सचिव माननीय हारूनभाई इनामदार,सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे सर, बन्सल क्लासेसचे सहसंचालक गोविंद ठोंबरे सर तसेच मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे सर यांनी सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जीवन शिक्षण परिवाराच्या पराक्रमी विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सिद्ध केले की केज तालुक्यातील प्रतिभेला मर्यादा नाही!



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077